राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना विमान प्रवास सवलत अनुज्ञेय करण्याबाबत.......

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रवास - १०२२ /प्र.क्र.११ /सेवा- ५**
खो.क्र.३३३ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ डिसेंबर, २०२२.

**वाचा-**

१) शा.नि.,वित्त विभाग, क्रमांक:प्रवास- १००३/प्र.क्र.३८/सेवा-५, दिनांक २० एप्रिल २००४
२) शा.नि.,वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.५३/सेवा-५,दिनांक २७ सप्टेंबर,२००५
३) शा.नि.,वित्त विभाग, क्रमांक:प्रवास- १०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ०३ मार्च, २०१०
४) शा.नि.,वित्त विभाग, क्रमांक:प्रवास- १०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक २३ जून, २०१०
५) शा.नि.,वित्त विभाग, क्रमांक:प्रवास- १०११/प्र.क्र.१/सेवा-५, दिनांक २१ जानेवारी, २०११

**प्रस्तावना -**

विमान प्रवास विषयक प्रचलित तरतूदींनुसार सचिवांपेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांना विमान प्रवास अनुज्ञेय ठरत नाही. केवळ न्यायालयीन व विधिमंडळ कामकाजासाठी अन्य कोणत्याही साधनाने/ मार्गाने वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीने विमान प्रवास करता येतो. याशिवाय अन्य कोणत्याही कारणासाठी विमान प्रवास अनुज्ञेय ठरत नाही. तथापि सर्वच महत्वाच्या शासकीय कामकाजासाठी उदाहरणार्थ- केंद्र शासनाकडे महत्वाच्या बैठकींना उपस्थित रहाणे व केंद्र पुरस्कृत योजनांचे अनुदान प्राप्त करणे/ पाठपुरावा करणे, अशा कामांना प्रत्येक वेळी सचिवांना उपस्थित रहाणे शक्य होत नाही. अशा प्रसंगी त्यांच्या अधिनस्त मंत्रालयीन/ क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना शासकीय कामकाजासाठी उपस्थित राहवे लागते. यासंदर्भात राज्य शासनाने राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना विमान प्रवास सवलत अनुज्ञेय करण्याबाबत दि.२१.०१.२०११ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

न्यायालयीन व विधीमंडळाशी संबंधीत कामकाजाव्यतिरिक्त अन्य अत्यावश्यक शासकीय कामकाजासाठी प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी खालील तरतुदींच्या अधिन राहून त्यांच्या अधिनस्त मंत्रालयीन/क्षेत्रिय अधिकाऱ्यांना विमान प्रवास करण्यास परवानगी द्यावी:-

१. अन्य कोणत्याही साधानाने / मार्गाने नियोजित ठिकाणी विहीत वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांची पूर्वपरवानगी घेऊन विमान प्रवास करता येईल.

२. परतीच्या प्रवासासाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत परत येणे तातडीचे असले तर संबंधित विभागाच्या सचिवांची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

३. एका प्रसंगी फक्त एकाच अधिकाऱ्यास संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी परवानगी द्यावी.

४. सदर प्रवास हा अल्प दराने सेवा पुरविणाऱ्या विमान कंपन्यांच्या विमानाने व इकॉनॉमी क्लासनेच करणे आवश्यक राहील.

५.बिझनेस/एक्झीक्युटिव्ह क्लासने करण्यात आलेल्या विमान प्रवासाच्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरणार नाही.

६. सर्व प्रशासकीय विभागांना सदर प्रयोजनासाठी प्रत्येक आर्थिक वर्षात रू. २.५ (अडीच) लाख इतक्या कमाल मर्यादेपर्यंत खर्च अनुज्ञेय राहील. सदर खर्च संबंधीत विभागाने त्यांना आर्थिक वर्षात मंजूर तरतुदींतून करावा.

७. विमान प्रवासासंदर्भात सचिवांच्या मंजूरीने आदेश काढावेत व सदर आदेशात कामाच्या तातडीबाबतचे उचित समर्थन करावे. त्यामध्ये संबंधीत आर्थिक वर्षातील मागील विमानप्रवासाच्या देयकापर्यंतचा खर्च व संबंधीत आदेश गृहीत धरून होणारा एकूण खर्च याबाबतचा तपशिल नमूद करावा.

८. विमानप्रवास मंजुरी आदेशाची प्रत देयकासोबत जोडून अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय/ जिल्हा कोषागार कार्यालय यांना पृष्ठांकित करणे आवश्यक राहील.

९. अधिदान व लेखा/ जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांनी विमानप्रवास मंजूरीच्या आदेशाच्या प्रतींशिवाय विमान प्रवास खर्चाची देयके पारीत करू नयेत, तसेच विभागामार्फत रू. २.५ लाखाच्या मर्यादेचे पालन होत आहे याचा हिशोब ठेवण्याची व्यवस्था करावी.

१०. विमान प्रवास अनुज्ञेयतेविषयी अंमलात असलेले उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) हे आदेश यापुढेही अंमलात राहतील व सदरहू शासन आदेशांनुसार करण्यात आलेल्या विमान प्रवासावरील खर्च वरील परिच्छेद ६ प्रमाणे घातलेल्या रू. २.५ लाखांच्या मर्यादेव्यतिरिक्त राहील.

११. सदर आदेशातील तरतूदी ह्या त्वरित अंमलात येतील व सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी सुध्दा रू. २.५ लाखापर्यंतचा खर्च अनुज्ञेय राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१२१६१५४७५७२६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PATIL PRASHANT VINAYAKRAO

Digitally signed by PATIL PRASHANT VINAYAKRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2b1bad66664b1e11e3bf66db1d526143e814db5f8c505422af66a5628314537e, pseudonym=52A6F57E50F36E268CFB25B4597BB272A28E8E8C, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PATIL PRASHANT VINAYAKRAO
Date: 2022.12.16 15:50:44 +05'30'

(प्रशांत पाटील)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

| | |
|---|---|
| राज्यपालांचे सचिव<br>मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>उपमुख्यमंत्री यांचे सचिव<br>सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई<br>सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई<br>सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई<br>सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख<br>प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.<br>प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.<br>सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई.<br>सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई. | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.<br>संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,<br>विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,<br>ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.<br>बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १<br>भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०<br>भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४<br>भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ |

| | |
|---|---|
| प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br>मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई<br>आयुक्त राज्य माहिती आयोग,(सर्व)<br>सचिव राज्य निवडणूक आयोग,मुंबई.<br>प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/ औरंगाबाद.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे<br>सर्व विभागीय आयुक्त.<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.<br>महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई<br>महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर<br>महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर<br>सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,<br>संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई<br>अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई<br>संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई,<br>सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर. | इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५<br>नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१<br>शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८<br>वित्त विभागातील सर्व कार्यासने<br>निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-३) |